महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा ‘दिवाकर कृष्ण’ पुरस्कार प्राप्त

# फणसाखालचं घर

**चंद्रकुमार नलगे**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B120

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर

**फणसाखालचं घर : चंद्रकुमार नलगे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये २२०/-

मित्रवर्य प्राचार्य रा. रं. बौराडे

सौ. सुलभाताई रा. बौराडे

आणि

मित्रवर्य बाबा भांड

सौ. आशाताई बाबा भांड

यांना आदरपूर्वक अर्पण

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. फणसाखालचं घर | .......... | ५ |
| २. चाळ | .......... | २३ |
| ३. मस्तक | .......... | ३५ |
| ४. आणि चोर आले | .......... | ४९ |
| ५. सरहद्द | .......... | ७० |
| ६. स्वप्नसती | .......... | ८५ |
| ७. चकवा | .......... | १०० |
| ८. धन्नू | .......... | ११४ |
| ९. कुकडी | .......... | १२९ |
| १०. पाळत | .......... | १४६ |
| ११. लंका | .......... | १५९ |
| १२. झुला | .......... | १७२ |
| १३. गिन्यान | .......... | १८३ |
| १४. काळाची पावलं | .......... | १९४ |
| १५. गावगुंडी | .......... | २१० |


❖ ❖ ❖

## फणसाखालचं घर

आजचा दिवस म्हणजे काळूमाच्या धांदलीचा दिवस. कसली ती उसंत नसते. तहानभूक पार विसरून जातात. मध्यान्ह रात्र उलटली की त्यांच्या डोळ्याला डोळा नसतो. बाहेर अंधार माखलेला असो, नाही तर लख्ख चांदणं पडलेलं असो. उठायचं, मागच्या दारातल्या फणसाखालचं चुलाण पेटवायचं. पाणी तापत ठेवायचं. गुराढोरांची घाणढाण काढायची. शेळ्या-कोकरांची उस्तवारी करायची. मगच बाकी सारं. त्यांची चाहूल लागली की सरसाबाईही लगबग उठायच्या. सकाळची आवरावर करायच्या. काळुमानं आणलेल्या मुळ्या-पाला घ्यायच्या. भल्या मोठ्या खलबत्त्यात घालून कुटत राहयच्या. त्यांच्या कुटण्याच्या आवाजानं झाडाझुडपातल्या त्या तीस-चाळीस घराझोपड्यांना जाग यायची. तांबूस रंग आभाळाला चढायचा. चांदणं मावळत जायचं. तांबडं फुटल्यालं झालं की सरसाबाईंचा खलबत्ता थांबे. जिथल्या तिथं खाणाखुणांनी ठेवलं जायचं. तेवढ्यात काळूमा चुलीवर चहा ठेवत. त्यांचं आंघोळपाणी झालेलं असे. केळीजवळच्या तांबड्या, पांढऱ्या जाईची फुलं तोडत. देव पुजायला बसायच्या आधी सरसाबाईला आठवण करून देत.

'आधी चहा घे बघू.'

खलबत्त्यात औषधी पाला कुटून सरसाबाईंचा जीव दमलेला असे. त्या कुडाला टेकून थोडा विसावा घेत. भरून आलेले हात सैल होत. ताठरलेलं सारं अंग थोड्याशा विसाव्यानं थंड होई. अवघडलेल्या मानेची हाडं मोडत. दमगीर झालेलं तनमन शांत झाल्यावर त्या उठत. चुलीच्या भानुशीवर ठेवलेला चहा चुलीजवळ बसून घोट घोट घेत राहत. चुलीतल्या धगधगणाऱ्या रक्शावर नजर स्थिर करून तशाच एकाग्र बसत. का कुणास ठाऊक त्या धगधगणाऱ्या रक्शावर नजर स्थिर झाल्यावर त्यांच्या जीवाला कसंसंच वाटे. भल्या सकाळी उदास वाटे. स्वत:ला हरवून त्या तशाच बसलेल्या असायच्या. कितीतरी वेळ. काळूमाची पूजा आटोपायची. देवाचं पाणी तुळशीला घालायला जाताना त्यांचं लक्ष चुलीपुढच्या रक्शांच्या तांबूस उजेडात बसलेल्या सरसाबाईंच्याकडं जाई. ते क्षणभर अडखळत. म्हणत,

'हे काय? किती वर्षं चालायचं हे असं. चहाची सुदाक आठवण नाही.' अर्धा चहाचा कप हातात तसाच ठेवून निखाऱ्याकडं एकटक पाहात असलेल्या सरसाबाई एकदम दचकत. भानावर येत. आपलं हरवणं त्यांच्या लक्षात येई आणि मग त्यांना अधिकच उदास वाटे. हळूहळू त्यांचे डोळे भरून येत. ही त्यांची अवस्था काळूमाच्या ध्यानात येई. ते सरसाबाईंच्या जवळ जात. हातातलं देवाच्या पुढचं निर्माल्य, पाण्याचं भांडं त्यांच्याकडं देत. म्हणत,

'हे एवढं तुळशीला घालून ये.'

फणसाखालच्या घरात असं हे कित्येक दिवस चाललं होतं. सकाळच्या वेळी अशा चुलीतल्या रक्शाजवळ बसल्या की, त्यांना उदास वाटे. एरव्हीही काही कामं करता करता आपोआप त्यांचा हात थांबे. भान हरपत. एकटक कुठल्या कुठे पाहात राहत. काळूमांना सरसाबाईंचं असं हरपणं चिंता लावी. केव्हा केव्हा औषधं खलताखलता त्यांची तंद्री लागे. मध्येच त्यांचा हात थांबे. असे कितीदा तरी त्यांचे हात खलबत्त्यात सापडले होते. बोटात रक्त साकळे. काळूमाच्या डोळ्यांना आसवांचं झळांबे लागत. काळूमा साऱ्या गावाला औषधानं बरं करीत. पण सरसाबाईंच्या या रोगावर त्यांना औषध सापडत नसे.

त्यांच्या औषधानं नाना प्रकारच्या लोकांचे नाना रोग बरे केले होते. कुणाची सांधेदुखी असो, नाही तर कमरेनं धर सोडलेला असो, कुणाचं हाड मोडलेले असो, हाडसांद्रीचा पाला त्यावर रामबाण औषध. कुणाचा दमा असो, नाही तर कुणाच्या पोटातला वायुचा गोळा असो, काळूमाच्या हातानं यश दिलं नाही असं कधी होत



नसे. हा औषधी वनस्पतीचा पाला शोधायला सारा डोंगरमाथा पालथा घालावा लागे. मुळ्या खणायला डोंगरकुसाडीच्या उभ्या कड्याला झोंबी घ्यावी लागे. कुणा झाडाच्या साली काढायला काटेरी जाळ्याजुळ्यांतून झाड शोधावं लागे. धनगरवाड्यावरच्या घनदाट पहाडातून डोंबी द्यावी लागे. पण काळूमा कधी थकला नाही. दमला नाही. शिणला नाही. हातावर भिस्त होती. झाडझाडोऱ्यावर माया होती. वडिलांपासून घेतलेला वसा मोठ्या नेकीनं काळजाशी बांधून ठेवला होता. घराण्यात चालत आलेला हातगुण वडिलांनी याच नेमानं जपला होता. मरताना वडील म्हणाले होते,

'काळबा, घराण्यात चालत आलेला वसा आहे हा. टाकू नको. घेतला वसा दूर सारू नको.'

काळूमांनी वडिलांच्या थरथरत्या हातावर हात ठेवला होता. वचन दिलं होतं. गावची मानाची पाटीलकी फिरत काळूमाच्या घरात आली, तर काळूमा म्हणाले होते,

'पाटीलकीची चावडी माझ्या काय कामाची. डोंगराची वतनकी ही लाखमोलाची.'

काळूमांनी पाटीलकीकडे ढुंकूनही पाहिलं नाही. त्यांना तिचा मोह वाटला नाही. माणसांसाठी त्यांची पायपिटी अखंड चालू राहिली. सरसाबाईंनी कशात मन दाखवलं नाही. काळुमाला साथसंगत केली. काळूमांनी डोंगरातून काटेकुटे तुडवून पाला-मुळ्या गोळा करायच्या आणि सरसाबाईंनी खलबत्त्यात कुटून त्यांचं चूर्ण करायचं. कुणी औषधासाठी दारात आला नि तसाच परत गेला असं कधी घडलं नाही. दु:खीकष्टी माणसांचा दुवा हीच त्यांची दौलत होती.

माणसांवर त्यांची भिस्त होती.

सरसाबाई लग्न होऊन या गावात आली होती. तेव्हा वीस तीस घरांची ही वाडी होती. डोंगराच्या झाडीत लपलेली. गाडी-घोडं जात नव्हतं. उभ्या डगरणीनं चालत जेव्हा जावं, तेव्हा कुठं तुरळक घर नजरेस पडे. असं असलं तरी या गावाचं नाव चौमुलखात होतं. तिच्या घरानंच एवढं मोठं नाव त्या गावाला मिळवून दिलं होतं. पायात साधा काटा मोडला, तरी या गावाचं नाव आठवे. दोन तीन डुया या घरातला खलबत्ता दमला नव्हता. थांबला नव्हता. सरसाबाईला याचंच कौतुक होतं. दु:ख विसरण्यासाठी आपल्या दारात आलेली माणसं पाहून तिच्या अंत:करणाला पाझर

फुटे. गार पाण्याचा रांजण अंगणातल्या फणसझाडाच्या गार सावलीत असायचा आणि ताकाचा डेरा आतल्या चौखंडात असायचा. फणसाखालच्या गार पाण्यानं तहान हरपे. डेऱ्यातल्या मधूर ताकानं जीवाला तरतरी येई. सरसाबाईंच्या व्याकूळ नजरेची माया माणसाला सारं सारं कष्ट विसरायला लावी. काळूमांच्या हातचं औषध मिळालं या भरवंशानं माणसाचा निम्मा आजार बरा होई.

कुणी औषधापोटी काही दिलं तर ते जसंच्या तसं त्या माणसाच्या पदरात परत बांधलं जाई. सरसाबाईजवळ खिनभर बसलं तरी बायामाणसांचं दु:ख कुठल्या कुठे नाहीसं होई.

जवळपासच्या गावातली माणसं काही दुखलं खुपलं नसलं, तरी केवळ सरसाबाईंना नि काळूमांना भेटायला ओढीनं येत. इथं यावं, मनीच्या दोन गोष्टी बोलाव्या, काळीज हलकं करावं. जीव कसा थंड होई इथं. दिस ढळला तरी इथनं उठावंसं वाटतच नसायचं.

आज सरसाबाईंचं लक्ष कशातच नव्हतं. काळूमांनी दिलेलं देवाचं पाणी तुळशीत टाकायचं त्या विसरूनच गेल्या होत्या. त्या तशाच तुळशीच्या कट्ट्याजवळ उभ्या होत्या. भान हरवल्यागत उभ्या असलेल्या सरसाबाईंना पाहून काळूमा तिथं गेले. म्हणाले,

'सरसा, हे काय? बरं नाही का?'

सरसाबाई भानावर आल्या. काळूमा पुढं झाले. देवाच्या पाण्याचं ताम्हण त्यांनी घेतलं आणि म्हणाले,

'सरसा, डोळ्यात पाणी?'

सरसाबाईंनी स्वत:ला सावरीत पदरानं डोळं पुसलं. म्हणाल्या,

'नाही. काही नाही.'

'नाही कसं? चल. घरात चल.'

काळूमांनी देवाचं पाणी तुळशीत ओतलं. सरसाबाईंच्या बकोटयाला धरून घरात आणलं. चौखंडात बसवीत म्हणाले,

'खरंच सांग. कसलं अवघड वाटलं तुला?'

'नाही. काही नाही...' सरसाबाई घोगऱ्या आवाजात म्हणाल्या.

'नाही कसं. तुझी नजर सांगतेय. तुझा भरून आलेला आवाज सांगतोय. खरं सांग. कसलं अवघड वाटलं आज?'



सरसाबाईंनी आतापर्यंत दाबून ठेवलेला आवंढा फुटला. म्हणाल्या,

'बाबुन्या स्वप्नात आलाता आज.' सरसाबाईंना रडू आवरेनासं झालं.

काळुमाही गप्प झाले. अगतिक झाले. त्यांनी एक उसासा टाकला. हळवे होत म्हणाले,

'कसलं होतं स्वप्न?'

सरसाबाईंनी स्वत:ला आवर घालीत सांगितलं,

'जत्रंचं.'

'जत्रंचं?'

'हां. जत्रंचं... भली मोठी जत्रा भरली होती. देवाची पालखी दिसत नव्हती. माणसं मात्रं गुलाल खोबरं उधळीत होती...'

सरसाबाई बोलता बोलता थांबल्या. काळजीनं व्यग्र होऊन भरल्या कंठानं म्हणाल्या,

'असलं स्वप्न वाईट असतं म्हणतात.'

काळूमाही दुचित झाले. उसासा टाकून म्हणाले,

'बाबुन्या स्वप्नात आला म्हणालीस...'

'हां. माणसं त्याच्यावरच गुलाल उधळीत होती.'

'आता त्याच्यावर गुलाल उधळला काय नि नाही काय सारखंच.' काळूमा.

'पर लय वर्षांनी स्वप्नात आला बाबुन्या. आला ते आला. असा. गुलालानं माखल्याला.'

खरंच बाबुन्या खूप वर्षांनी सरसाबाईंच्या स्वप्नात आला होता. सरसाबाई हळूहळू त्याला विसरल्या होत्या. काळानं त्याची स्मृती पुसत आणली होती. सणासुदीलाही त्याची आठवण येईनाशी झाली होती. कुणाचं पोर मुंबईहून आलं की मात्र वेडयासारख्या विचारायच्या,

'माझ्या बाबुन्या कुठं डळाचला का?'

आशेनं पाहात राहायच्या. पण मुंबईत रापलेलं पोर म्हणे,

'वेडी आहेस सरसाकाकू.'

'नाही पर...'

'सतरा-आठरा वर्षं झाली की आता. आम्हाला एक वर्षाचाबी कढ निघत नाही. कवा गाव बघीन, कवा माणसांना भेटन असं होतं. ही तर इतकी वर्षं उलाटली. असता तर...'

सरसाबाई या उत्तरानं गप्प गप्प होई. त्यांचा जीव गलबले. आशा निराशेचा खेळ म्हणजे त्यांचे जगणं झालं होतं. त्यांना भास छेडीत. त्यांना बाबुन्या इथं तिथं दिसे.

...एवढा बाबू. गोलगोबऱ्या गालाचा. टपोऱ्या डोळ्यांचा. फुगऱ्या पण छान नाकाचा. नजर तर किती ओढ लावणारी. आयाबाया यायच्या. त्याचा अलाबला घ्यायच्या. आपल्या घरला घेऊन जायच्या. काही खाऊ द्यायच्या. बाजारला गेल्या तर त्याच्यासाठी काही ना काही आवडीनं आणायच्या. द्यायच्या. भारी लोभ त्यांचा. लोभ लावणारंच ते पोर होतं.

म्हणून बायका त्याला आवडीनं बाबुन्या म्हणायच्या. सरसाबाईंचा बाबू. पण गावानं त्याच्या नावाचं बारसं बाबुन्या असं केलं. तशीच ती रीत पडली. बाबुन्या एकुलता एक. लाडानं मोठा झाला.

सरसाबाईना बायका म्हणायच्या,

'सरसाक्का तुझा लाडोबा म्हंजी लाडोबाच आहे.'

बाबुन्या कळता झाला. शेरडा-कोकरांना चारून आणू लागला. काळुमाच्या हाताखाली आला. ओढ्यापलीकडच्या गावात उन्हापावसातून शाळेला जाऊ लागला. जंगलओढे म्हणजे केवढाले. शाळेला जाताना साकवावरनं जावं लागे. चालताना तो करकर वाजे. हेलकावत राही. त्याच्या कातण्या आता जुन्या झाल्या होत्या. सारखा लपकत राही. सरसाबाईंना साकवाची भीती वाटे. बाबुन्या शाळेला गेला की त्यांची त्या साकवाची भीती अधिकच गडद होई. एकदा तर बाबुन्या साकवावरनं जाताना साकव तुटल्याचं स्वप्नं पडलं. तेव्हापासून तर त्यांना रूखरूखही लागून राहिली. साकवावरच्या गावातलं शिक्षण संपलं, तेव्हा सरसाबाईंच्या जीवात जीव आला.

पुढं शिकण्यासाठी जवळपास शाळाही नव्हती. त्यामुळं बाबुन्याचं शिक्षण थांबलं. अवतीभवती डोंगर ओलांडून जावं लागे तेव्हा पेठेचं गाव लागे. नाहीतर दऱ्या-खोऱ्यात झाडीत लपलेली छोटी गावं. वाड्या, धनगर सडे. जीव रमवायचा तर गुराढोरासंग. रानपाखरासंग. जुनाट देवळातल्या धुनीभोवती बसून उगाच आपल्या इकडच्या तिकडच्या गप्पा रंगविण्यात वेळ घालवायचा. मुंबईच्या चाळीतनं राहून आलेला एखादा मुंबईकर आठपंधरा दिवस तरी या झोपड्याखोपड्यातल्या भाबड्या जीवापुढं मुंबईचं मायाजाल उभं करी. मग त्याच त्याच गोष्टी सांगून मुंबईकर कंटाळे.



त्याचा जीव उबगे. त्याला मुंबईच्या रंगेरी फुटपाथची ओढ लागे. तो उठे. मुंबईची वाट धरी. मग ही वाडीतली माणसं त्या मुंबईकरानं सांगितलेल्या गोष्टींच्या आठवणी चघळत राहत. या वाडीतल्या फणसाआंब्याखालच्या जुन्या-पाण्या घराझोपडीतल्या पोरांना पंखं फुटत. अशी पंख फुटली की मुंबईच्या फुटपाथवर जाऊन उतरत. वाडीत उरत स्त्रिया. म्हातारी-कोतारी माणसं. ती वडसं वाढलेल्या डोळ्यांनी मुंबईच्या सांगाव्याची वाट पाहात राहत. एखादा मुंबईवाला वर्सा दोन वार्सांनी येई. तेव्हा या वाडीत तरतरी येई. पंखं फुटायला ओलेलीं पोरं त्याच्या अवतीभवती फिरत. खोदून खोदून त्याला अनेक गोष्टी विचारीत. त्यांच्या हुर्द्यात मुंबई पेटे.

कर्तसवरतं पोर या डोंगरजाळीतनं उडून जाई.

तसाच बाबुन्या शेरडा-कोकरांना पाला आणायला म्हणून गेला तो सांज झाली तरी परतला नाही. कडुसं पडलं. जेवण वेळ टळली. सरसाबाईंनी देवाला साकडं घातलं. घरात उभं वारं सुटलं. काळूमानं शोधाशोध केली.

सरसाबाईंच्या मनात नाना शंका आल्या. साकवाकडंही जाऊन आल्या. सरसाबाईंनी अन्नपाणी सोडलं. काळूमानं पाव्हण्यापैकडं चौकशी केली. त्यांच्या मनात पाल कुचकुचली. त्यांनी सरसाबाईंना विचारलं,

'एवढ्यात मुंबईकर कोण आलाता का वाडीत?'

'कानावर नाही. तुम्ही भाईर फिरतासा. तुम्हाला माहिती.'

काळुमानं साऱ्या वाडीत चौकशी केली. पण या एक-दोन महिन्यात कुणीच मुंबईकर गावात आला नव्हता. काळूमाला तेवढाच एक आशेचा धागा होता. पण तोही संपला. पेठेच्या गावाला जाऊन काळूमानं पंचांगात बघितलं. गावाला जाऊन नायकोबाला कौल लावून पाहिलं.

दिवसे न् दिवस काळुमाचं घर खंगत गेलं. घराचा एकुलता एक पोर असा कसा आभाळ फोडून नाहीसा झाला कळलं नाही.

सरसाबाईंनी धीर सोडला. अंथरूण धरलं. काळूमाही पार पार थकून गेले. पण दारात आलेल्या माणसांचं दु:ख पाहून ते दु:ख विसरत चालले. औषधं देण्यानं घर थोडं सावरलं. काळूमा सरसाबाईंना म्हणाले,

'सरसा, माझं मन सांगतंय, बाबुन्या येईल. केव्हा तरी येईल.' सरसाबाई या बोलानं धीर धरायच्या. वाट पहात रहायच्या. बाबुन्या घरातून गेल्यापासून सरसाबाईंनी घर सोडलं नाही. कुठल्या गावाला गेल्या नाहीत. त्यांना वाटायचं,

‘आपण कुठं बाहेर गेलो आणि बाबुन्या आला तर...? घरात नाही असं पाहून परत गेला तर...?’

एक खिनभरही त्या घर सोडून कुठं गेल्या नाहीत. बाहेरच्या सोप्यात खांबाला टेकून त्या वाटेकडं नजर लावून बसायच्या. लांब दरडवणीवरून येताना कुणी दिसलं की आपला बाबुन्याच आला असं त्यांना वाटायचं. एका रात्री मध्यान्हीलाच त्या उठल्या. काळुमाला जागं करीत म्हणाल्या,

‘अहो उठा उठा. आपला बाबुन्या आलाय... उठा.’

असं म्हणून दार उघडायला घाईनं गेल्या. उंच सोप्याच्या पायऱ्यांचंही त्यांना भान राहिलं नाही. अंधारात पायरीवरनं पुढच्या खांबावर आदळल्या. खाली पडल्या. पाय मुरगळला. डोक्याला लागलं. उठता येत नव्हतं तरी त्या काळूमाला म्हणाल्या,

‘अहो उठा. दार उघडा. बाबुन्या आलाय.’

काळूमा धावत आले. सरसाबाईंना उठवून सरळ केलं. दार उघडून पाहिलं तर बाहेर कुणीच नव्हतं. फणसाखाली पाहिलं, मागच्या दारी पाहिलं. पण बाबुन्या कुठं दिसला नाही. काळूमा सरसाबाईंना म्हणाले,

‘नाही. कुठंच नाही.’

‘बघा तरी. दार ठोठावताना मी बघितलाय. बघा. असंल.’

काळूमांनी विचार केला आणि म्हणाले,

‘तुला भास झाला असंल.’

‘नाही हो. मी पाहिलंय त्याला. माझ्या डोळ्यांनी. दार ठोठवत होता. कापडं मळली होती. किती तरी दिवस उपाशी असल्यासारखा दिसत होता.’

‘स्वप्नं पडलं असल तुला.’

‘नाही. स्वप्न नाही. मी माझ्या डोळ्यांनी पाहिलाय. खोटं कशाला सांगू?’

‘सरसा, तू त्याला स्वप्नात पाहिलास. नाही तर दाराबाहेरचा बाबुन्या तुला कसा दिसंल? स्वप्नंच ते...’

सरसाबाईंच्या ध्यानात आलं. त्यांना हळूहळू पटत गेलं. ते स्वप्नंच असावं. पण स्वप्न म्हटल्यावर तर त्या बाबुन्याच्या आठवणीनं अधिकच कष्टी झाल्या. स्वप्नातला थकलेला, उदास बाबुन्या आठवून त्यांचं आईचं काळीज गदगदून गेलं.

कित्येक दिवस तो कापडं फाटलेला, खोल खोल डोळं गेलेला, केविलवाण्या



चेहऱ्याचा बाबुन्या त्यांच्या डोळ्यासमोरून हालत नव्हता. सरसाबाईं काळूमाच्या पायावर डोकं ठेवून म्हणाल्या, ‘काय बी करा पण माझ्या बाबुन्याला हुडकून आणा.’

काळूमांनाही वाटलं, कुठंच एका रात्रीही न रहाणारा बाबुन्या इतके दिवस कुठं राहिला असेल. काळूमानं सारा मुलुख पालथा घातला. डोंगर-दऱ्या तुडवल्या. मुंबईलाही जाऊन आला. सोनुळच्याच्या पाव्हण्याचं पोरगं असंच पळून गेलं होतं. मुंबईला सापडलं होतं. तसा बाबुन्या संगतीसंगतीनं पळून गेला असेल म्हणून काळूमानं तिथंपर्यंतही पायपीट केली. पण मागमूस काही लागला नाही.

दिवसानं दिवस सरत होतं. दारातलं फणसाचं झाड वठत चाललं होतं. सरसाबाईचं नि काळूमाचं मनही हळूहळू घट्ट होऊ लागलं होतं. पण वाडीतल्या बाबुन्याच्या शिणंजोडीच्या पोरांना पाहिलं की त्यांना बाबुन्या आठवे. कुणाचं लग्न झालं होतं. कुणाला एक मूलही झालं होतं. कुण्या म्हाताऱ्या आई-बापाला काठीचा आधार कुणी झालं होतं. कुणाची लग्नाची धामधूम चालली की सरसाबाईंना बाबुन्या आठवे. त्याचं लग्नाचं व्हराड... तो लग्न मांडव... ते वाजंत्री... त्या मुंडावळ्या... ती हळदीनं पिवळी झालेली नवी नवरी... पाया पडायला जोडीनं आलेला बाबुन्या... एक सुंदर चित्रं डोळ्यासमोर उभं राही आणि त्याचवेळी सरसाबाईंच्या डोळ्यात महासागर उभा राही.

कुणा सासुरवाशिणीची शिदोरी आली की, सरसाबाईंना फार फार अवघड वाटे. त्या अधिकच एकाकी होत. घर सुनं सुनं वाटे.

एकदा सरसाबाई फणसाखाली म्हैशीला धूत होत्या. तेवढ्यात एक माघारीण चालली होती. ती फसणाखाली थांबली होती. चढानं चढून आल्यानं दमली होती. सावलीखाली बसली. तिच्या काखेला चित्रासारखं लहान पोर होतं. जरीच्या कपड्यांनी नटलं होतं. पायात वाळे, तोडे, हातात बिंदल्या, गालावर काजळाचं बोट लावलेलं. गोरंपान-किती छान दिसत होतं आणि ते मूल सरसाबाईंकडं पाहून ओढ घेत होतं. सरसाबाईंना मुलांची आवड. ते गोजिरवाणं पोर आपल्याकडं ओढ घेतेय म्हटल्यावर त्या त्याच्याकडे आल्या ‘माझ्याकडं येणार’ असं त्याला म्हणून त्यांनी त्याला उचलून घेतलं. मायेनं त्याचा पापा घेतला आणि त्याच्या आईकडं वळून म्हणाल्या,

‘कोणत्या गावची तू?’

‘धडामवाडद्याची.’

‘कुणाच्यातली?’

‘तातेरावाची सून?’

‘हो.’

‘म्हणजे लक्ष्मूची...?’

‘बायको...’

‘लक्ष्मूचं पोर हे?’ सरसाबाई आश्चर्यानं म्हणाल्या.

लक्ष्मू म्हणजे बाबुन्याचा मित्र. एका वारंगीचं दोघं. एका वर्गात शिकत होतं. कधी कधी बाबुन्याबरोबर यायचा. आंबंफणसांच्या सुगीत तर चुकायचा नाही. दोघं म्हणजे राम-लक्ष्मणाची जोडीच वाटायची. एकदा तर किती आवडीनं सरसाबाईंनी भोपळद्याच्या घाऱ्या केल्या होत्या. घाऱ्या खाता खाता दोघं घरभर नाचली होती. आता सरसाबाईंना ते सारं आठवलं नि त्यांचं मन भरून आलं.

‘माझ्या बाबुन्याचं पोरही एवढंच असतं.’

मनातला भार आवरीत त्या म्हणाल्या,

‘आता लक्ष्मू काय करतो?’

‘मुंबयला असत्यात. म्याबी तिकडंच असतीय.’

‘मग कधी आलीयस?’

‘परवाच.’

‘आणिक लक्ष्मू?’

‘ते नाहीत आलेले. रजा मिळत नाही.’

‘कसल्या कामाला आहे.’

‘गिरणीत, आता कसा थकवा येतोय त्यास्नी म्हणून म्हणले, धोपेश्वराला देवाला जाऊन ये. म्हणून आलोय. नारळ द्यायचंत.’

सरसाबाईंनी तिला घरात नेलं. तिला ताक दिलं. पोराला आपल्या हातानं दूध पाजलं. लक्ष्मूला काय काय होतंय म्हणून विचारलं. एक छोटी बाटली घेतली. ती तिला दिली. तिनं विचारलं,

‘काय हे?’

‘काढा आहे. रोज दोन तीन चमचे दुधातनं घ्यायला सांग. बरं वाटंल.’

लक्ष्मूची बायको जायला निघाली. पोराला सरसाबाईचा लळा लागला. कसं



तरी पोराला तिनं सोडवून घेतलं. सरसाबाईंनी पोराला डोळं भरून पाहून घेतलं. म्हणाली,

‘जा आता. लक्ष्मूला सांग...’

‘काय?’

‘तुझ्या बाबुन्या कुठं भेटला तर बघ... त्याचा तपास करून कळीव.’

लक्ष्मूची बायको पाठमोरी झाली तेवढ्यात डोंगराला गेलेले काळूमा आले. सरसाबाईंना म्हणाले, ‘कोण पोर ती?’

‘लक्ष्मूची बायको?’

‘कुठल्या?’

‘धडामवाडद्यावरच्या.’

‘म्हणजे बाबुन्याचा...’

‘मित्र. तोच. त्याचीच बायको.’

काळूमा बघत राहिले. डोकीवर लोकांच्या जखमा बऱ्या करण्यासाठी आणलेली डोंगरी औषधं होती. पण त्यांच्या काळाजातल्या जखमा बऱ्या करायला औषध सापडत नव्हतं. वातावरणही जखमी झाल्यासारखं बनलं.

सरसाबाई म्हणाल्या,

‘ती काय म्हणत होती माहिती आहे का?’

‘कोण?’

‘लक्ष्मूची बायको.’

‘काय म्हणाली?’

‘म्हणाली, तुमचा बाबुन्या येईल परत.’

‘काय? अशी म्हणाली?’

‘होय?’

‘तिला आढळला की काय कुठं?’

‘नाही.’

‘ती म्हणत होती, तिच्या मामाचा जावई असाच एकाएकी कुठं गेला होता. त्याचं लग्न झाल्याच्या दुसऱ्याच वर्षी कुठं गेला आणि परत आला तो आपल्या मुलीच्या लग्नात.’

‘म्हणजे अठरा-वीस वर्षांनी घरी परतला म्हणायचा.’

'हां. तसंच झालं की.'

'पण एवढी वर्षं कुठं होता?'

'त्यानं काही सांगितलं नाही म्हणं.'

काळूमाची नजर दूरच्या डोंगरावर स्थिर झाली.

सरसाबाईंनाही काहीशी आशा वाटली. त्यांच्या मनाला अंकूर फुटल्यासारखं झालं. मनातल्या मनात देवाला विनवलं,

'देवा, धोपेश्वरा, माझा बाबुन्याही असाच परत येऊ दे. तुला सोन्या-चांदीचं डोळं घालीन.'

अशाच एका दिवशी कडुसं पडलं होतं. बाहेर अंधार पसरला होता. काळूमा औषधाच्या मुळ्या चेचून त्याचा रस काढीत होते. तेवढ्यात फणसाखाली कुत्रं भुंकल्याचं आवाज आला. काळूमा तसेच उठले. दाराजवळ जाऊन म्हणाले,

'कोण आहे ते?'

'म्या. पारगावकर. औषधासाठी आलो होतो.'

काळूमानं शांतपणे ऐकून घेतलं. जेवण वेळ झाली. पाव्हण्याला जेवायला वाढलं. दोघेही जेवले. मग इकडचं तिकंडच बोलत बसले. बोलता बोलता बाबुन्याचा विषय निघाला. पाव्हणा दुचित झाला. बाहेरचा अंधार अधिकच गंभीर बनला. बाबुन्याचा विषय निघाला तशी सरसाबाई उंबऱ्याजवळ येऊन बसल्या. म्हणाल्या,

'आवं पाव्हण्यापैच्या गावाला जायचं झालं तरी घराबाहेर पाय न काढणारा बाबुन्या. असा कसा कुठं गेला कळेना. आता कुठं शोधायचं पोराला. इतकी वर्षं झाली.'

पाव्हणा काहीतरी आठवल्यासारखं करीत म्हणाला,

'येईल तुमचा बाबुन्या परत.'

'कशावरनं म्हणता असं?' काळुमा म्हणाले.

'आमच्या गावचा माणूस. गेला कुठं उठाउठी. घरी तरणीताठी बायको. पदरात एक पोरगी. चांगली धापंधरा वर्सं झाली. बायकोनं वाट बघितली. पोरगी थंडीतापानं गेली. बायकोबी कुठं गेली तिचं नाव नाही. मग पाच-सहा वर्षांनी एक माणूस देवळात आला. दाढी केस वाढलेलं. भगवी कफनी घातलेली. कुणाशी बोलणं न्हाई का चालणं न्हाई. तोही अचानक कुठं गेला. कुणी म्हणाले, तोच त्या बाईचा नवरा. पळून गेलेला. असं असतं बघा. किती मुलुख माणूस हिंडला,



तरी मूळ गावच्या मुळ्या काय तुटत न्हाईता.' काळूमांनी सुस्कारा टाकला. वळून बघितलं तर तिथं सरसाबाई आतल्याआत हुंदक्यानं दाटून आलेल्या दिसल्या. ते तिला सावरीत म्हणाले,

'सरसा, वाटंचं वाटसरू एवढं सांगतायत तर येईल बाबुन्या. घरच्या मुळ्या पार तोडण्याइतका आपला बाबुन्या कठोर नाही. झाडाची फांदी शेरडासाठी तोडायची म्हटलं तरी त्याचं हात उचलत नव्हतं. बघ तरी. येईल.'

'खरंच उगवंल का हो तसा दिवस?'

घोगऱ्या आवाजानं सरसाबाईंनी विचारलं,

'येईल. आमची पुण्याई नसली तरी या घराला लाभल्याली वाडवडिलांची पुण्याई काय कमी नाही.'

सरसाबाई परड्यातल्या अडगळीची साफसफाई करीत होत्या. कळकीच्या बेटाचा पाला, काटक्याकुटक्या यांनी परडं जंजाळ भरल्यासारखं झालं होतं. जुनीपाणी लाकडं पडली होती. बऱ्याच दिवसांनी त्यांना थोडी उसंत मिळाली होती. ते सारं साफसूफ करता करता जांभळीच्या नि कळकाच्या चिलटणीतनं उंच गेलेल्या आंब्याच्या झाडाकडं त्यांचं लक्ष गेलं. त्यांनी कुहुलहानं आंब्याच्या शेंड्यापर्यंत नजर टाकली. सळनळ उंच काठीसारख्या गेलेल्या आंब्याच्या शेंड्याकडं पाहिलं नि त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. त्या धावतच फणसाखाली बसलेल्या काळूमांना बोलावण्यासाठी गेल्या. त्या घाईनं म्हणाल्या,

'अहो, जरा परड्यात या. पळा.'

काळूमाही धावत आले आणि त्यांनी विचारलं,

'काय?'

'ते बघितलं का?'

'कुठं?'

'आंब्याच्या शेंड्यावर. मोहर आलाय आंब्याला.'

'हो की. नवलच आहे.'

'पहिल्यांदाच आलेला माहेर आहे तो.'

'पण हा आंबा...?'

'माझ्या बाबुन्याचा.'

'बाबुन्याचा?'

'हां. बाबुन्याचा. लहान असताना आंबा खाता खाता त्यानं आंब्याची कोय बेटाकडं टाकली होती आणि म्हणाला होता...'

सरसाबाईंना आठवण झाली. त्यांचा कंठ भरून आला. काळूमांनी विचारलं,

'काय म्हणाला होता बाबुन्या?'

'आई, बेटात उगवेल का गं माझा आंबा... मग मी म्हटलं, तुझा हात चांगला असंल तर उगवंल. वाढंल. मोठं होईल झाड.'

आणि मग सरसाबाईंच्या डोळ्यासमोर नाचरा, हसरा-आनंदानं चमकणाऱ्या डोळ्याचा बाबुन्या नाचू लागला. त्यानं त्यावेळी त्या आंब्याचे आंबे तोडल्याचा, आंबा चोखण्याचा आविर्भाव करीत सारं परडं नाचून गादवलं होतं. सरसाबाईंना तो प्रसंग आठवून आणि झाड मोहरल्याचं पाहून खूप खूप आनंद झाला होता. बाबुन्याच्या हाताला यश आलं होतं. त्याची कोय उगवली होती. कळकीच्या आत कुणालाही न दिसता वाढली होती. मोहरली होती.

सरसाबाईही मोहरून गेल्या.

नवा उत्साह आला. बाबुन्याच्या आठवणी त्यांना सतावू लागल्या. अंगणातल्या फणसाखाली बसून त्या बाबुन्याची वाट पहात राहू लागल्या. कधी उठून पेटीतल्या वस्तू काढून त्यावरनं मायेनं हात फिरवत राहू लागल्या... बाबुन्याचं वाळे... त्याच्या बिंदल्या... त्याचं लहानपणचे जुने कपडे... गोंड्याचं टकुचं...

गोंड्याचं टकुचं तर त्यांनी स्वत:च्या हातानं बनवलं होतं. ते रेशमी गोंडे... चकमकणाऱ्या भिंगाचे ते रंगीत टकुचं बाबुन्याला किती छान दिसे.

त्या टकुच्यांनं त्याला दृष्टही लागली होती. त्यानं आपला सुंदर मुखडा आरशात पाहिला होता. तेव्हा ते एवढंसं पोर पण किती हरकून गेलं होतं. बाबुन्याचीच जणू साजऱ्या आरशातल्या त्या साजऱ्या बिंबाला नजर लागली. दुसऱ्या दिवशीच तो आरसा तडकून फुटला होता.

आंब्याचं झाड मोहरल्याचं पाहिल्यापासून सरसाबाईंना नवं बळ आलं. त्यांना बाबुन्या येण्याचंच भास होऊ लागलं. सारं घर झाडून लखलखीत करून टाकलं. कधी नव्हे तो तुळशीचा कट्टा सारवला. फणसाखालचं अंगण शेणानं सारवून स्वच्छ ठेवू लागल्या. शेरडीच्या नाजूक कोकरांच्या गळ्यात त्यांनी घुंगरांचे रेशमी कंठे बांधले. बाबुन्यानं म्हैशीच्या गळ्यात बांधायला आणलेल्या घंटद्या तो गेल्यापासून अडगळीत पडल्या होत्या. त्या त्यांनी म्हैशीच्या गळ्यात बांधल्या. बाबुन्याला



फणसांच्या पानात उकडलेली वाळकीची फसणफळं आवडायची. ती फणसफळं करण्यासाठी त्यांनी भोसल्यांच्या रखमा आत्याकडनं पिकलं वाळुकही आणून ठेवलं होतं. फणसांची छानशी पानं हेरून ठेवली होती. आता त्यांनी सारं सारं आवरून ठेवलं होतं. तयार ठेवलं होतं. फक्त आता बाबुन्याच यायचा राहिला होता. फणसाच्या झाडाच्या फांद्याफांद्यांना फळांच्या किती छानशा कोयऱ्या पडल्या होत्या. त्या कोयऱ्या सरसाबाईंच्या मनालाही फुटल्या होत्या. सगळ्या भरभरून आलेल्या कोयऱ्याच कोयऱ्या. झाडाच्या फांद्याफांद्यावर आणि सरसाबाईंच्या श्वासाश्वासावर.

दिवस पालटू लागले तसे आशा-निराशांचे खेळ सुरू झाले. त्यांना वाटायचं, घर सोडून माणसं परमुलूख का धुंडतात. असं कसं त्यांचं मन असंल. असं कसं त्यांचं जगणं असंल.... त्यांना रक्ताच्या माणसांची आठवण होत नसंल का... घराची नाळ पारच अशी तुटत असंल? जन्मल्या घरादाराची... झाडाझुडांनी लावलेल्या लळ्याची आठवण पुसून जात असंल? गावपांढरीची माया पारच आटत असंल... बाबुन्या तसा नव्हताच. आम्ही शेताभाताकडं गेलं की बाबुन्या घरात आमच्या वाटंकडं डोळं लावून बसायचा... बाबुन्या, आता एवढं घट्ट मन कसं केलंस... तुला कशाकशाची सय होय नसंल? बाबुन्या, तसा तू नव्हतासच... तुला होत असंल आठवण... अगदी सारं सारं तुझ्या काळजात हालत असंल... तुझं डोळं भरून येत असतीलच... मग तू कुठं थांबलाईस? की कशात अडकलाईस? बाबुन्या कसं कळावं आम्हाला? आम्ही डोंगराकणगरातल्या जाळ्याजुळ्यातली माणसं... कसं कळावं आम्हाला बाहेरच्या जगाचं वारं... बाबुन्या तुझ्या आठवणीनं हुर्दं फुटत्यात रं आमचं... कुठल्या संकटात सापडला असलास तर सांग. आम्ही इकडचा डोंगर तिकडं करू...

एक दिवस काळूमा नेहमीसारखे तांबडं फुटताना उठले. अंगणात बघतात तर फणसाच्या गळून पडलेल्या बाळ कोयऱ्यांनी सारं अंगण भरून गेलेलं. त्यांच्या पोटात धस्स झालं. सरसाबाई उठायच्या आधी त्यांनी त्या बाळकोयऱ्या गोळा केल्या आणि दूर झाडीत नेऊन टाकल्या. काळुमा गळालेल्या बाळ कोयऱ्यांनी अस्वस्थ झाले.

सूर्य मावळतीला गेला. धरित्रीभर पसरलेल्या किरणांची आवराआवर झाली. गाईगुरं घराकडं परतली. पक्षी आपल्या घरट्याच्या ओढीनं चालले. सूर्यानं फणसाच्या झाडावरची आपली उरलीसुरली किरणं काढून घेतली. अंधारानं विझत्या जगाची